**हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.**
**दिनांक २९.०९.२०२२**

अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :— मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २८/०९/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १०९ वाहन चालकाविरूध्दकार्यवाही करण्यात आली असुन त्यांचेकडुन ७१,७००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :— मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधदारूविक्री कायदया अंतर्गत दिनांक २८/०९/२०२२ रोजी दारूबंदी कायदयाअंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोस्टे हटटा येथे ०१ ठिकाणी छापा मारून कार्यवाही करून आरोपीतांकडुन ५.४ लिटर दारू असा एकुण २,१०० रू.किअं.अवैध दारूचा साठा  जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द दारूबंदी कायदया अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

जबरी चोरी :— दिनांक २८/०९/२०२२ रोजी फिर्यादी मोम्मीन अन्वर अब्दुल खयुम रा. पावरलुम वसमत यांचे फिर्यादी वरून पोस्टे वसमत शहर येथे कलम ३९२,३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२७.०९.२२ रोजीचे २३:३० वा चे सुमारास परभणी ते वसमत रोडवरील बेले याचे शेता जवळ आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे व साक्षीदार यांचे पिकअप क्र एम.एच.३४ ए.बी.७४७९ परभणी ते वसमत जाणारे रोडवर बेले यांचे शेताजवळ वसमत येथे चाकुचा धाक दाखवुन बळजबरीने  आडवुन ३९,००० रू चोरून नेले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात वसमत शहर पोलीस तपास करित आहेत.

चोरी :— दिनांक २८/०९/२०२२ रोजी फिर्यादी विशाल विश्वनाथराव चव्हाण व्य.नौकरी सह. अभियंता रा तारोडा बु नांदेड ह.मु. यशवंतनगर हिंगोली ता जि हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे नर्सी ना.येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.१९.०९.२०२२ रोजीचे दुपारी २.०० वा ते दिनांक २५.०९.२०२२ रोजीचे दुपारी ११.०० वा दरम्याण मौजे गिलोरी शिवारात कयाधु नदीच्या डाव्या काठावर अज्ञात आरोपीने गिलोरी शिवारातुन कयाधु नदीच्या डाव्या काठावर ठेवलेले कोल्हापुरी बंधाराचे पाणी आडविण्याचे लोखंडी गेट एकुण १९ नग प्रत्येकी साईज २.१५ बाय ०.५० मिटर आकाराचे व रबरी सिल बसविलेले प्रत्येकी नग किंमती ६,६०० असा एकुण एकुण १,२५,४०० रू चा मुदेमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला आहे म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात नर्सी ना.पोलीस तपास करित आहेत.

पोलीस अधीक्षक हिंगोली

करिता